# हिमालयाशी सांगति नाते

हिमालयाशी सांगति नाते सह्यगिरीचे कडे
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र जय निनादती चौघडे
दगडांचा हा देश, छाती दगडाची याची
अभंग आवेशाच्या मागे स्फूर्ती शिवबाची
राष्ट्रधर्म हा एकच तारा बुद्धि-शक्तीच्या पुढे
पराक्रमाने रसरसलेले पौरुष तेजस्वी
लाव्हा होउन रौद्र रुपाने दिक्काला भिववी
अत्याचारी, जुलमी नमले सदैव ह्याच्यापुढे
गडागडावर, कड्याकड्यावर इतिहासाच्या खुणा
मनामनावर मंत्र घालुनी देत नव्या प्रेरणा
मान रक्षिण्या इथे शिंपले किति रक्ताचे सडे
भक्तिरसाने न्हाउ घालती गोदा-इंद्रायणी
ललित कलांची अंगावरती किति कोरिव लेणी
पसायदानें तृप्त भूमि दे मानवतेचे धडे
हा संतांचा देश, सोयरा पीडित-दुखितांचा
हा वीरांचा देश आक्रमक, रक्षक दीनांचा
तळपतील सदैव जोवर चंद्र-सूर्य हे खडे